# शासकीय तंत्रनिकेतन, कोल्हापूर

( महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था)

विद्यानगर, जुना पुणे - बेंगलोर महामार्ग, कृषी महाविद्यालयासमोर, कोल्हापूर – ४१६००४

दुरध्वनी क्र. (०२३१)२५२१०३८ फॅक्स क्र. २५२१०१६ gpkolhapur@yahoo.com


## दिव्यांग ( अपंग ) व्यक्तींसाठी प्रथम वर्ष पदविका प्रवेश २०१७-१८ (अंतिम फेरी)

शासकीय तंत्रनिकेतन, कोल्हापूर येथे केंद्रशासन पुरस्कृत दिव्यांग (अपंग) प्रशिक्षण योजने अंतर्गत प्रथम वर्ष पदविका अभियांत्रिकी स्थापत्य — ०२, यंत्र - ०५, विद्युत - ०५, औ.अणुविद्युत - ०५, माहिती तंत्रज्ञान - ०४ अशा एकूण **२१** शिल्लक जागांसाठी इयत्ता १० वी पास दिव्यांग (अपंग) विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येणार आहे. सदरहू प्रवेशासाठी दिव्यांग विद्यार्थ्यांस एस.एस.सी. परिक्षेत किमान ३५% गुण आवश्यक आहेत. एस.एस.सी. परिक्षा गणित (सांकेतिक क्र. - ०७१ - बिजगणित व भूमिती ), सामान्य विज्ञान( सांकेतिक क्र. - ०७२ ) व इंग्लिश या विषयामध्ये उत्तीर्ण असणे तसेच किमान ४०% दिव्यांग असल्याचा जिल्हा रुग्णालयाचा दाखला असणे आवश्यक आहे. अभ्यासक्रमासाठी प्रवेश हा सामान्य उमेदवारांसाठी असलेल्या नियमाप्रमाणे गुणवत्तेनुसार देण्यात येईल. या योजने अंतर्गत प्रवेशार्थीस पुर्ण शैक्षणिक फी माफी, मोफत वसतिगृह (भोजन भत्ता प्रति महिना १०००/- रु. सह), पुस्तके व स्टेशनरी साठी भत्ता (रु. ३०००/- प्रतिवर्ष) इत्यादी सोयी सवलती केंद्र शासनाच्या नियमानुसार देण्यात येतील.

ज्या इच्छुक दिव्यांग विद्यार्थ्यांनी या प्रवेशासाठी अर्ज केलेला नाही अशा दिव्यांग विद्यार्थ्यांनी संस्थेमध्ये उपलब्ध असलेले अर्ज विकत घेवून ( खुला प्रवर्ग – रू. ४००/- व मागास प्रवर्ग - रू. ३००/-) दि. ०८/०८/२०१७ पर्यत आवश्यक कागदपत्रांच्या दुय्यम प्रतिसह अर्ज जमा करावेत.

या अंतिम फेरीच्या प्रवेशासाठी ज्या दिव्यांग ( अपंग ) विद्यार्थ्यांनी केंद्रीभुत पदविका प्रवेश प्रक्रीया २०१७-१८ साठी अर्ज केला आहे तसेच ज्या दिव्यांग विद्यार्थ्यांनी सामान्य विद्यार्थ्यांसाठीच्या प्रवेश प्रक्रीया २०१७-१८ मध्ये पदविका अभ्यासक्रमासाठी इतरत्र प्रवेश घेतलेला आहे यांनाही संधी देण्यात येणार आहे.

अशा सर्व इच्छुक दिव्यांग विद्यार्थ्यांनी दि. १४/०८/२०१७ रोजी सकाळी ११.०० वाजता मूळ कागदपत्रे व इतर फी अंदाजे रू. २५००/- सह उपस्थित रहावे.

या फेरीमध्ये तात्पूरता प्रवेश देण्यात आलेल्या विद्यार्थ्यांची वैद्यकीय चाचणी मुंबई येथे होईल. त्यासाठी विद्यार्थ्यास VRC ( Vocational Rehabilitation Center ), Western region, Chunabhatti, Chembur, Mumbai येथे जावे लागेल. वैद्यकीय चाचणीनुसार विद्यार्थ्याचा प्रवेश निश्चित करण्यात येईल.

प्राचार्य,<br>
शासकीय तंत्रनिकेतन, कोल्हापूर